*दहाव्या पंचवार्षिक योजनेसाठी*

# दारिद्र्य रेषागणना- २००२ पासून सुरू... ०३... ०५... २०??

*प्रांजळ दीक्षित*

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या पार्श्वभूमीवर २००२ साली हाती घेतलेली गरिबी रेषेखालील कुटुंबांची गणना (सर्वेक्षण) ही आजवरची सर्वांत वेळखाऊ आणि 'खर्चिक' गणना असू शकेल. गणनेची प्रक्रिया वेगवेगळ्या राज्यांमध्ये, जिल्हास्तरावर सुरू झाल्यानंतर मध्यंतरीच्या काळामध्ये पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. महाराष्ट्रामध्ये २००३ साली या गणनेचे काम प्रत्यक्षामध्ये सुरू झालेले असले तरीही अद्यापपावेतो दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या याद्यांना प्रशासनास अंतिम स्वरूप देता आलेले नाही. वास्तविक पाहता दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२००२ ते २००७) विविध योजनांचे लाभार्थी या यादीच्या साहाय्याने निश्चित होणे अपेक्षित होते. दहावी पंचवार्षिक योजना सुरू होऊन खरे तर चार वर्षे उलटूनही गेली आहेत. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना विविध योजनांचे लाभ मिळणे तर दूरच, परंतु ११व्या पंचवार्षिक योजनेसाठी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या गणनेची प्रक्रिया जवळ येऊन ठेपली आहे.

प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटाने या संपूर्ण प्रक्रियेचा एक छोटासा अभ्यास, या प्रश्नावर काम करणाऱ्या अनुभवी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने केला. या अभ्यासातून पुढे आलेल्या निष्कर्षांवर विचारविनिमय करण्यासाठी महाराष्ट्रातील संस्था-संघटनांसोबत चर्चासत्र आयोजित केले होते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या गणनेच्या संपूर्ण प्रक्रियेचे विश्लेषण लोकांसमवेत बसून विश्लेषण करून या प्रक्रियेतील त्रुटी समोर आणण्याची गरज या चर्चासत्रामध्ये मांडली गेली. हे लक्षात घेऊन प्रयासने अशा प्रकारच्या विश्लेषणाच्या प्रक्रिया गावागावांमध्ये चालवण्यासाठी मार्गदर्शक साधन (टूल) म्हणून 'दारिद्र्यरेषा गणना प्रक्रिया तपासणी यादी' (चेकलिस्ट) तयार केली होती. या साधनाच्या आधारे जुन्नर (पुणे) तालुक्यातील दोन गावांमध्ये समांतर सर्वेक्षण 'रेशनिंग कृती समिती' या संस्थासंघटनांच्या नेटवर्कने हाती घेतले होते. तसेच 'वनसंपदा' या विदर्भातील संस्थेने हाती घेतलेल्या शाश्वत-सुरक्षित उपजीविका अभियानांतर्गत नागपूर जिल्ह्यातील दोन गावांमध्ये अशा प्रकारचे लोकसहभागी विश्लेषण घडवून आणले. दोन गावांमध्ये पुन्हा एकदा संपूर्ण कुटुंबाचे सर्वेक्षण केले गेले. तसेच तीन गावांमध्ये आजवर दारिद्र्यरेषा गणनेच्या संदर्भामध्ये गावामध्ये घडलेल्या प्रक्रियेचे लोकांसमवेत बसून विश्लेषण केले गेले. सदर लेख वरील उपक्रमांतून निर्माण झालेली समज व निष्कर्षांवर आधारित आहे. अशा प्रकारचे प्रयत्न पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयासने इतर संस्था-संघटनांच्या साथीने केलेला उपक्रम व फलित वाचकांसमोर मांडणे हे सदर लेखाचे उद्दिष्ट आहे.

**दारिद्र्यरेषा गणना २००२ : वैशिष्ट्ये**

वास्तविक पाहता भारतामध्ये १९६०च्या दशकापासूनच पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून गरिबी दूर करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांचा अपुरेपणा लक्षात घेऊन शासनाने– केंद्र सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे निश्चित करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमली. या समितीने ठरवून दिलेल्या निकषांनुसार सन १९९७ साली गणना करण्यात आली, ज्यामध्ये प्रथमच पूर्वी आधार म्हणून मानले गेलेले निकष (आर्थिक उत्पन्न, कॅलरी-फॉर्म्युला) बदलून नवीन निकषांच्या आधारे सदर प्रक्रिया पूर्ण केली गेली.

सन २००२ साली सुरू झालेली दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची गणना अनेक अंगांनी

**खरे तर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादी निश्चित करण्याची प्रक्रिया ही मुळातच एक राजकीय स्वरूपाची प्रक्रिया आहे. ही प्रक्रियाच जेव्हा पारदर्शी होत जाते आणि अधिकाधिक घटकांचा सहभाग त्यामध्ये वाढत जातो तेव्हा त्याची 'गुंतागुंत' अधिकच वाढत जाते. दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजनांचा 'लाभ' घेण्यासाठीची पात्रता हेच यामागील सगळ्यांत महत्त्वाचे कारण. या साऱ्या 'गरीब' ठरण्या-ठरवण्याच्या 'स्पर्धे'मध्ये 'खऱ्या' गरीब कुटुंबाची ताकद टिकून राहण्याइतकी नसते. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर 'प्रक्रियेच्या स्तरावरील सुधारणा' जरी महत्त्वाच्या असल्या तरीही त्याला मर्यादा आहेत...**

परिणामस्वरूप या दोन्ही गावांमध्ये शासनास लोकांच्या मागणीनुसार पुनर्सर्वेक्षण करावे लागले.

तसेच गेली चार वर्षे शासनाने सातत्याने 'काम' करूनही दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या याद्या पूर्ण न झाल्याने प्रयास व जनसहयोग प्रतिष्ठान या संस्थांच्या एकत्रित पुढाकाराने रत्नागिरी जिल्ह्यातील, संगमेश्वर तालुक्यातील एकूण ३ गावांमध्ये लोकसहभागाने शासकीय प्रक्रियेची चिकित्सा व समांतर सर्वेक्षणाचा एक उपक्रम राबवण्यात आला. समांतर सर्वेक्षणामध्ये शासनाने ठरवलेले निकष कायम ठेवून परंतु योग्य प्रक्रियेच्या आधारे

वैशिष्ट्यपूर्ण ठरली ती वरील बदलांमुळेच. १९९७ साली केल्या गेलेल्या सर्वेक्षणामध्ये गरिबी रेषेखालील कुटुंबे निश्चित करण्यासाठी आधार म्हणून मानल्या गेलेल्या निकषांमध्ये प्रथमच गरिबीचे काही वैविध्यपूर्ण निर्देशक Indicators जसे की कच्चे/पक्के/घर, जमिनीची मालकी व • क्षेत्रफळ, मोठ्या व मौल्यवान वस्तूंची मालकी इत्यादी निर्देशक आर्थिक निकषांच्या जोडीनेच समाविष्ट करण्यात आले. २००२ साली केल्या गेलेल्या सर्वेक्षणामध्ये या निर्देशकांची संख्या वाढवून आणखी काही निर्देशक (उदा. कर्जबाजारीपण, बालमजुरी, असे एकूण १३) समाविष्ट करण्यात येऊन त्याआधारे सर्वेक्षण पूर्ण केले गेले. तसेच सर्वेक्षणाच्या प्रक्रियेमध्येही काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले.

### गणनापत्रकातील निर्देशक : दारिद्र्याचे नव्हे, शासनाच्या संकुचित दृष्टिकोनाचे

गेल्या चार वर्षांतील महाराष्ट्रामध्ये झालेल्या प्रक्रियेकडे पाहिले तर 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे ठरवण्यासाठी निश्चित केलेले निकष/निर्देशक' आणि सर्वेक्षणासाठी निश्चित केलेली व प्रत्यक्षात घडलेली प्रक्रिया अशा दोन्ही स्तरांवरती अनेक विसंगती असल्याचे लक्षात आले आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या निश्चितीकरता केलेल्या सर्वेक्षणाच्या प्रश्नावलीमध्ये इतर माहितीच्या जोडीनेच एकूण तेरा निर्देशक-प्रश्न होते. या प्रश्नांच्या आधारे प्रत्येक 'कुटुंबाची रूपरेषा' तयार केली जाणे अपेक्षित होते. या १३ निर्देशकांना प्रत्येक ५ पर्याय दिले असून या पर्यायांना ० ते ४ असे गुण देण्यात आले. म्हणजेच एका कुटुंबास कमीत कमी ० व जास्तीत जास्त ५२ गुण देण्यात येणार होते. प्रश्नावली (गणनापत्रका)च्या आधारे प्रथम सर्वेक्षण झाल्यानंतर 'छाटणी' गुण जाहीर होऊन छाटणी गुणांच्यापेक्षा कमी गुण मिळालेली कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे ठरवण्यात येणार होती. यापैकी ग्रामीण भागातील वास्तवाच्या पार्श्वभूमीवर 'गरीब' कुटुंबे ओळखण्यासाठी निश्चित केले गेलेले एकूण तेरा निर्देशांकांचे विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, या निर्देशकांपैकी काही निर्देशक हे गरिबी मोजण्यासाठी आधारभूत मानणे मुळातच चुकीचे आहे. हे निर्देशक गरीब कुटुंबाच्या परिस्थितीशी कसे विसंगत ठरतात याची काही उदाहरणे आपण पाहू शकू.

उदाहरणार्थ, 'सरासरी कपडे परिधान उपलब्धता' (निर्देशक ३) असा एक गरिबी मोजण्यासाठीचा निर्देशक गणनापत्रकामध्ये समाविष्ट केलेला आहे. एकूण कपड्यांच्या उपलब्धतेनुसार गुण देऊन त्याआधारे गरिबीचे मोजमाप करणे मुळातच हास्यास्पद आहे. ग्रामीण भागातील 'सधन ब्राह्मणाकडे' कपड्यांचा एक जोड तर 'बहुजन वर्गाकडे' 'हौसेपोटी' अनेक 'जोड' असे चित्र दिसते. शिवाय वेगवेगळ्या समारंभांतून दिले जाणारे कपडे– त्यांचीच संख्या ५-६ पातळांवर जाऊन शकते. त्यामुळे कपड्यांवरून 'आर्थिक स्थिती गरीब नाही' असे अनुमान काढणे संपूर्णपणे चुकीचे ठरले असे निदर्शनास आले आहे. किंवा 'स्वच्छता' या निर्देशांकामध्ये मंजुरीनंतर घर बांधण्याच्या आधी संडास बांधावा लागतो आणि एखाद्या गरीब कुटुंबाने त्याचाच वापर खोपटीसारखा केलेला असतो. शिवाय गरीब वा श्रीमंत सगळ्यांनीच उघड्यावर जाण्याची पद्धत ग्रामीण भागात सर्रासपणे प्रचलित आहे. 'खाजगी घरगुती संडास' या पर्यायास ४ गुण तर 'उघड्यावर शौचास बसणे' याला ० गुण दिलेले आहेत. यामुळे तुलनेने सधन असलेली कुटुंबे या न्यायाने '०' गुण मिळवून गरिबी रेषेच्या खाली गेली असे निदर्शनास आले आहे. तसेच उदा. 'घरातील जास्त शिकलेल्या प्रौढ व्यक्तीचे साक्षरता प्रमाण' या निर्देशकावरूनही गरिबीचे मोजमाप करता आलेले नाही. त्यातून कुटुंबाचा सामाजिक वा आर्थिक दर्जा समजला गेलाच नाही. गरीब कुटुंबातही एखादीच व्यक्ती शिकलेली असू शकते. मुलगा-किंवा मुलगी असा फरकही पर्यायांमध्ये केलेला नाही, त्यामुळे मुलगी शिकलेली पण लग्न झालेली असेल तर काय, हाही प्रश्न अनुत्तरित राहतो.

मुळामध्येच चुकीच्या असणाऱ्या निर्देशकांबरोबरच काही निर्देशकांचे पर्यायही चुकीच्या पद्धतीने ठरवले गेल्याने या सर्वेक्षणाचे जवळजवळ संपूर्ण गणनापत्रकच विसंगत झाले आहे. उदाहरणार्थ, घराचा प्रकार या निर्देशकासाठी दिलेल्या पर्यायांनुसार 'पक्के घर' असणाऱ्या कुटुंबास ३ गुण दिलेले आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात गरीब असणारे परंतु शासकीय योजनेतून पक्के घर मिळालेले गरीब कुटुंबही '१' गुण मिळवण्याऐवजी जास्तीचे गुण मिळवेल. किंवा 'अन्नसुरक्षा' यांसारख्या महत्त्वाच्या निर्देशकासाठी दिलेल्या पर्यायांतून खरे गरीब कुटुंब ओळखता आलेले नाही. पर्यायात वापरलेली 'चौरस' आहार ही शब्दयोजना केवळ 'पोटभर' आहार या अर्थाने वापरली गेली आणि प्रत्यक्षात मात्र शिळी भाकरी भात-कालवण हेही पोटभर जेवण ठरले. 'कुटुंबाच्या मजूर शक्तीचा दर्जा' हा गरिबीचे मोजमाप करण्यासाठी योग्य निर्देशांक असला तरीही त्यासाठी दिलेल्या पर्यायांमधून मजुरी न मिळणारी, आई-बापांच्या बरोबर जाणारी, मालक ज्यांना नुसतेच जेवण देतो अशी किंवा जी गुरे राखायला जातात अशी तसेच सर्व प्रकारचे घरकाम (पाणी भरणे, फाटी आणणे) अशी 'बालमजूर' म्हणून ओळखली न जाणारी पण प्रत्यक्षात असणारी अनेक मुले-मुली बालमजुरीच्या पर्यायांमध्ये न गणली गेल्याने कुटुंबांना जास्त गुण मिळाले आहेत.

### गणनेची प्रक्रिया : अपेक्षित आणि प्रत्यक्षात

दारिद्र्यरेषा गणनेसाठी निकष आणि निर्देशकांच्या जोडीनेच, खरे तर अधिक बारकाईने या संपूर्ण सर्वेक्षणाच्या प्रक्रियेकडेही पहायला हवे. या सर्वेक्षणाच्या संपूर्ण प्रक्रियेची आखणी आजवर झालेल्या सर्व सर्वेक्षणांपेक्षा अतिशय वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण होती. पारदर्शित्व आणि लोकसहभाग या संकल्पना प्रत्यक्षात येतील अशा पद्धतीने प्रक्रियेची आखणी केली गेल्याचा दावाही यावेळी केला गेला. परंतु आखणीनुसार अपेक्षित प्रक्रिया आणि

वास्तवातील स्थिती अशा पद्धतीने प्रक्रियेचे विश्लेषण केल्यास या दोहोंमध्ये कमालीचे अंतर असल्याचे दिसून आले आहे.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षणासाठी तालुकापातळीवर प्रगणकांची निवड (माहिती संकलक) वास्तविक पाहता आरोग्य आणि शिक्षण खात्यांच्या कर्मचाऱ्यांमधून करावयाची होती. प्रत्यक्षात मात्र आरोग्यमंत्र्यांनी त्यांच्या खात्याचे कर्मचारी हा 'अतिरिक्त भार' पेलू शकणार नसल्याचे जाहीर केल्याने परिणामी अर्धशिक्षित बेरोजगारांची प्रगणक म्हणून निवड करण्यात आली. यामुळे प्रगणकांच्या गुणवत्तेवर मर्यादा आली.

सर्वेक्षणास सुरुवात करण्यापूर्वी प्रगणक, तसेच सरपंच व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांचे संपूर्ण प्रक्रियेबाबत प्रशिक्षण होते अपेक्षित होते. या दोन्ही गटांचे प्रशिक्षण विशेषत: संबंधित कुटुंबांनी दिलेल्या माहितीचा योग्य अर्थ लावून गणनापत्रकामध्ये दिलेल्या प्रश्नाच्या (निर्देशकांच्या) योग्य पर्यायापुढे खूण करण्याच्या दृष्टीने प्रगणकांचे प्रशिक्षण अतिशय महत्त्वाचे होते. तसेच प्रक्रिया पारदर्शी होण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत आणि ग्रामसभेचे प्रशिक्षणही तितकेच आवश्यक होते. प्रत्यक्षात मात्र प्रगणकांचे प्रशिक्षण केवळ औपचारिकता म्हणून पार पाडले गेले आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशिक्षणे झालीच नाहीत. याचा परिणाम प्रक्रियेवर झाला. प्रगणकांनी सर्वेक्षणाची जी पूर्वतयारी करणे आवश्यक होते ती तयारी केली गेली नाही. सर्वेक्षणापूर्वी गावाला भेट न देता एकाच भेटीत मिळेल तेवढी माहिती गोळा करण्यात आली. यामुळे अनेक ठिकाणी प्रगणकांनी कुटुंबांना प्रत्यक्ष न भेटताच सरपंच वा इतरांच्या मदतीनं माहिती भरण्याचा प्रयत्न केलेला आहे. बंद असलेल्या घरासाठी पुन्हा पुन्हा भेटी कोठेही दिल्या गेलेल्या नाहीत. काही ठिकाणी लहान मुलांकडून माहिती घेतलेली आहे. गणनापत्रके पेन्सिलनेच भरलेली आहेत. कित्येक ठिकाणी गुणांकनच केलेले नाही. संबंधित कुटुंबाला मिळालेल्या गुणांची कल्पना न देताच, काही ठिकाणी तर गणनापत्रक न भरताच लोकांच्या सह्या/अंगठे घेतलेले आहेत आणि निरक्षर व्यक्तींच्या गणनापत्रकाच्या शेवटी चक्क इंग्रजी भाषेमध्ये सह्या ठोकल्या आहेत. या सगळ्यांमुळे कुटुंबांच्या माहितीच्या विश्वासार्हतेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला.

लोकसहभाग हा या प्रक्रियेतील सगळ्यांत महत्त्वाचा पैलू. याही पातळीवर सर्वेक्षणाच्या प्रक्रियेची आखणी संपूर्णपणे अपयशी ठरली. शासनाने मार्गदर्शक नियमावलीमध्ये दिल्यानुसार सर्वेक्षणाची माहिती सर्व गावकऱ्यांमार्फत पोचवणे, प्रगणकांना सर्व गावकऱ्यांपर्यंत पोचायला मदत करणे, कच्च्या यादीच्या चर्चेसाठी ग्रामसभा भरवणे व अतिशय गरीब कुटुंबे त्याला उपस्थित राहतील असे बघणे, कच्च्या यादीतील त्रुटी अथवा चुका प्रगणकांच्या निदर्शनास आणणे आणि आवश्यक त्या प्रकरणी फेरतपासणी मागणी करणे अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायतीवर होती. या बाबी गावपातळीवर घडल्याच नाहीत. ग्रामसभा झाल्या असल्या तरीही गावातील वंचित घटक त्याला उपस्थित राहिले नाहीत. ज्या ग्रामसभांमध्ये वंचित घटक उपस्थित राहिले तेथे गावातील सत्ता-समीकरणांमुळे आपले प्रश्न वा तक्रारी मांडायला ते धजावले तरी नाहीत किंवा असे प्रश्न मांडण्याइतकी माहितीच त्यांना मिळालेली नव्हती. गणसंख्येअभावी ग्रामसभा तहकूब होऊन बऱ्याच ठिकाणी ग्रामसभेची 'औपचारिकता' पूर्ण करण्यासाठी घरोघरी जाऊन ग्रामसभेच्या ठरावावर सह्या घेण्यात आल्या. ग्रामसभेने जर याद्या मंजूर केल्या नाहीत, तर ग्रामसभेच्या तक्रारी प्रांत-अधिकाऱ्यांकडे पाठवणे व ग्रामपंचायतीने केलेल्या तक्रारअर्जाची दखल घेऊन पुनर्तपासणीचे आदेश देणे व आवश्यक तेथे मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता तपासणे, याही बाबींकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. परिणामी खरीखुरी गरीब कुटुंबे यादीतून वगळली गेली आणि मुळात धनिक असलेल्या कुटुंबांचा मात्र यादीमध्ये 'गरीब' म्हणून समावेश झाला.

याबाबत संगमेश्वर तालुक्यामध्ये शासकीय प्रक्रियेची लोकसहभागी चिकित्सा आणि समांतर सर्वेक्षण या दोन्ही उपक्रमांमधून पुढे आलेले निष्कर्ष डोळे उघडायला लावणारे आहेत. उदा. संगमेश्वर तालुक्यातील कुरधुंडा या गावामध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार गावातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या शासनाने जाहीर केलेल्या यादीपेक्षा दुपटीने जास्त असल्याचे आढळून आले आहे. तसेच काही ठिकाणी या याद्या ग्रामपंचायतींनी आणि ग्रामसभेने नामंजूर केल्या खऱ्या परंतु त्यानंतर कुटुंबांनी ज्या वैयक्तिक हरकती (केवळ संबंधित कुटुंबाचे सर्वेक्षण व गुणांकन तपासले जावे यासाठीच) दाखल करावयाच्या होत्या, त्यामध्ये मोठ्या संख्येने गावातील प्रस्थापितांचीच नावे आढळून आली. गावातील सत्ता-समीकरणामुळे ज्या हरकती दाखल झाल्या त्या बहुतांश ठिकाणी धनिक कुटुंबांच्याच दाखल झाल्या. ही बाब लक्षात आल्याने हरकती दाखल करून घेण्याजोग्या आहेत अथवा नाही याबाबत संभ्रम निर्माण होऊन अनेक हरकती दाखल करूनच घेतल्या गेल्या नाहीत. हरकती दाखल करून घेण्याजोग्या आहेत अथवा नाही याबाबतच्या नियमांची माहिती लोकांना हरकती नाकारताना दिली गेलेलीच नाही. अशामुळे ज्या खऱ्याखुऱ्या गरीब कुटुंबांनी हरकती दाखल करण्याचा प्रयत्न केला अशा कुटुंबांनाही यामधून वगळण्यात आले. सद्य:स्थितीमध्येही अनेक ठिकाणी याद्यांना अंतिम स्वरूप देण्यात आलेले नसून, जसजशी अधिकाधिक कुटुंबांना याबाबत माहिती होत आहे अशा कुटुंबांच्या 'तालुक्याच्या गावी' फेऱ्या सुरूच आहेत. हरकती नोंदवण्याची शेवटची तारीख तर केव्हाच उलटून गेली आहे.

संगमेश्वर तालुक्यातील ज्या गावांमध्ये लोकसहभागी विश्लेषण व समांतर सर्वेक्षणाचा उपक्रम राबवण्यात आला त्या दोन्ही गावांमध्ये ग्रामपंचायतींचा पुढाकार तर होताच, पण ग्रामसभांनीही अपुऱ्या तसेच अयोग्य सर्वेक्षणावर आधारित असलेल्या शासकीय याद्या फेटाळल्या.

याची प्रतिक्रिया पंचायत समित्यांच्या आमसभेमध्येही उमटली. संगमेश्वर आणि लांजा या दोन तालुक्यांमधील पंचायत समितीच्या वार्षिक आमसभेत जिल्हा प्रशासनाने जाहीर केलेल्या 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या' विविध गावांमधील याद्या फेटाळल्या जाऊन फेरसर्वेक्षणाची मागणी नोंदवण्यात आली. या उपक्रमांच्या तपशिलासह जिल्हाधिकाऱ्यांशी केलेल्या वाटाघाटींनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या उपक्रमातील गावांनी समांतर सर्वेक्षणाच्या शेवटी तयार केलेल्या याद्या शासकीय प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याची तयारी दर्शविली आहे.

या सर्व अनुभवातून प्रशासकीय पातळीवरील काही सुधारणांची गरज लक्षात आली, त्या खाली थोडक्यात मांडायचा प्रयत्न केला आहे.

१. राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनास एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची देशभरातील टक्केवारी ३४ ते ३६%च्या आत ठेवण्याविषयी स्पष्ट आदेश केंद्र शासनाकडून मिळाले आहेत. असे असले तरीही वेगवेगळी राज्ये व विभागांमधील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती भिन्न असल्याने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची जिल्हानिहाय व तालुकानिहाय टक्केवारी वेगवेगळी असू शकते. तसेच सध्याच्या पद्धतीमधील प्रश्नावली व गुणांकनावर आधारित गणनेला पर्याय म्हणून केंद्र सरकारकडून काही मार्गदर्शक सूत्रे पाठवली जावीत. प्रत्येक राज्यातील विशिष्ट भौगोलिक विभागातील (उदा. महाराष्ट्रामध्ये कोकण, मराठवाडा) वैविध्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन त्या विभागातील गावांसाठी त्या मार्गदर्शक सूत्रांच्या आधारे राज्य सरकारतर्फे एक आदर्श (मॉडेल) पद्धती तयार केली जावी.

२. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना करण्यासाठी आखण्यात आलेली प्रक्रिया अपेक्षेनुसार पाळली न गेल्याने अनेक कुटुंबांवर अन्याय झाला आहे. भविष्यात हे टाळण्यासाठी ग्रामसभा व ग्रामपंचायत या दोन्ही घटकांकडे सर्वेक्षणाच्या प्रक्रियेच्या नियंत्रणाचे अधिकार देण्याची आवश्यकता आहे.

३. या पद्धतीमध्ये गावागावांतील गरीब कुटुंबांपर्यंत या प्रक्रियेची संपूर्ण माहिती व्यवस्थित पोचावी यासाठी सध्याच्या प्रक्रियेत मूलगामी सुधारणा अपेक्षित आहेत. यामध्ये माहितीचे प्रसारण, संवादासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धतींचा समावेश करणे आवश्यक आहे. अशा पद्धतींच्या आधारे पुढील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षणासाठी नवीन पद्धतींचा अवलंब करण्यासाठी केंद्र शासनाकडे पुढील सुधारणेच्या दृष्टीने शिफारशी पाठवणे अत्यंत आवश्यक आहे.

वास्तविक पाहता या सर्वेक्षणाच्या प्रक्रियेमध्ये विविध स्तरांवरील शासकीय, प्रशासकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील सर्व संबंधित घटकांच्या (multistakeholder participation) भूमिका निश्चित केल्या गेल्या होत्या. ग्रामीण विकास मंत्रालय, जिल्हाधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तहसील यंत्रणा या नेहमीच्या प्रशासकीय यंत्रणेबरोबरच आमदार, ग्रामपंचायत, ग्रामसभा या लोकनियुक्त प्रतिनिधी/संस्थांनाही संपूर्ण प्रक्रिया योग्य पद्धतीने व्हावी यासाठी पुरेशा प्रभावीपणे हस्तक्षेप करण्याचे अधिकार दिले होते. तसेच संबंधित भागांमधील स्वयंसेवी संस्थांचाही या प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभाग होता. तरीही असे का घडले?

खरे तर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादी निश्चित करण्याची प्रक्रिया ही मुळातच एक राजकीय स्वरूपाची प्रक्रिया आहे. ही प्रक्रियाच जेव्हा पारदर्शी होत जाते आणि अधिकाधिक घटकांचा सहभाग त्यामध्ये वाढत जातो तेव्हा त्यातील 'गुंतागुंत' अधिकच वाढत जाते. दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजनांचा 'लाभ' घेण्यासाठीची पात्रता हेच यामागील सगळ्यांत महत्त्वाचे कारण. या साऱ्या 'गरीब' ठरण्या-ठरवण्याच्या 'स्पर्धे'मध्ये 'खऱ्या' गरीब कुटुंबाची ताकद टिकून राहण्याइतकी नसते. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर 'प्रक्रियेच्या स्तरावरील सुधारणा' जरी महत्त्वाच्या असल्या तरीही त्याला मर्यादा आहेत. प्रयास आणि सहयोगी संस्था संघटनांनी या संदर्भात केलेली माहिती, माहितीचे सहभागी विश्लेषण आणि त्याआधारे स्थानिक स्तरावरील जनवकिलीचे प्रयत्न हा लोकसशक्ती-करणाच्या प्रयत्नांचा एखादा मार्ग असू शकेल. त्याचबरोबर व्यवस्थेतील मूलभूत प्रश्नावर अधिक व्यापक विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्रांजळ दीक्षित**
संसाधने व उपजीविका गट,
प्रयास, पुणे
**विलास हांडे**, (पत्रकार, रत्नागिरी)

*माझ्या मते, 'प्लुटो'ची अनिष्ट ग्रहदशाच त्याला अखेर भोवली!*

